# जिल्हा निवड समिती, कोल्हापूर
# कोल्हापूर जिल्हा परिषद अंतर्गत पदभरती सन-२०१५
# जाहिरात क्रमांक - ०१/२०१५

जिल्हा परिषद, **कोल्हापूर**चे अधिनस्त विविध विभागांकडील सरळसेवेने भरावयाची गट-क व गट-ड संवर्गातील रिक्त पदे व माहे ऑक्टोबर २०१५ अखेर रिक्त होणारी संभाव्य पदे विचारात घेऊन खालील पदांकरिता http://198.24.159.244/ZPK या संकेतस्थळावर पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात व फक्त ऑनलाईन पद्धतीनेच, अर्ज मागविण्यांत येत आहेत. ऑनलाईन पद्धतीने केलेले अर्जच अधिकृत मानण्यात येतील, अन्य कोणत्याही प्रकारे केलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याकरितां हे संकेतस्थळ **दि.०२.११.२०१५** रोजी सकाळी १० वाजल्यापासून ते **दि.१५.११.२०१५** रोजी सायंकाळी **५.४५** वाजेपर्यन्त खुले राहील.

**पदभरतीसाठी संवर्गनिहाय रिक्त पदे**

| अ.क्र. | संवर्ग | एकूण रिक्त पदे |
|---|---|---|
| ०१ | **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य-बांधकाम विभाग)** | ०१ |
| ०२ | **विस्तार अधिकारी (कृषि)** | ०१ |
| ०३ | **विस्तार अधिकारी (शिक्षण) वर्ग ३, श्रेणी २** | ०१ |
| ०४ | **औषध निर्माण अधिकारी** | ०१ |
| ०५ | **आरोग्य सेवक (पुरुष) ५०% हंगामी फवारणी** | ०६ |
| ०६ | **आरोग्य सेवक (महिला)** | ४० |
| ०७ | **कंत्राटी ग्रामसेवक** | १४ |
| ०८ | **पशुधन पर्यवेक्षक** | ०२ |
| ०९ | **कनिष्ठ सहायक (लिपिक)** | ०१ |
| १० | **परिचर वर्ग-४** | ०४ |
| | **एकूण** | **७१** |

सरळसेवा भरती प्रक्रियेसंदर्भातील सविस्तर जाहिरात **www.zpkolhapur.gov.in व** http://198.24.159.244/ZPK या संकेतस्थळांवर उपलब्ध असून, सदर जाहिरातीत भरावयाच्या पदांची नांवे, संख्या व सामाजिक व समांतर आरक्षणानुसारची विगतवारी, पदनिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता व लेखी परीक्षेचे वेळापत्रक, विहित वयोमर्यादा, लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप सर्वसाधारण सूचना, विशेष सूचना, पदांच्या निवडीसाठीची विहित कार्यपद्धती, अटीं व शर्ती, विहित परीक्षा शुल्क, ऑनलाईन अर्ज करण्याची पद्धत व सर्व पदांसाठीच्या समान सूचना दिलेल्या असून उमेदवारांनी ही संपूर्ण माहिती काळजीपूर्वक समजून घेऊनच अर्ज http://198.24.159.244/ZPK या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीनेच भरावेत. अर्जाचा नमुना उक्त संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवाराने सदरचा अर्ज जाहिरातीत नमुद पद्धतीनुसार व सूचनांनुसार अर्ज भरावा.

सदर भरतीप्रक्रियेबाबत अद्ययावत सूचनांचे निवेदन **www.zpkolhapur.gov.in व** http://198.24.159.244/ZPK या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल आणि भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवारांची राहील.

भरती प्रक्रिया / परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार मा.अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, कोल्हापूर तथा जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना राहतील आणि त्यांचा निर्णय अंतिम असेल. तसेच, भरती प्रक्रियेसंदर्भातील वाद, तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार गट क साठी मा.अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, **कोल्हापूर** तथा जिल्हाधिकारी, **कोल्हापूर** व गट ड साठी मा. अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. कोल्हापूर यांना राहतील. तसेच, त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही किंवा वाद उपस्थित करता येणार नाही.

**सही/-**
**सदस्य जिल्हा निवड समिती, कोल्हापूर**
**व अध्यक्ष गट-ड निवड समिती**
**तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**

**सही/-**
**अध्यक्ष, जिल्हा निवड समिती,**
**तथा जिल्हाधिकारी, कोल्हापूर**

## माहे नोव्हेंबर २०१५ मध्ये कोल्हापूर जिल्हा परिषदेमधील गट- `क` व गट- `ड` च्या सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीची जाहिरात

**(जाहिरात क्रमांक ०१/२०१५) दिनांक: ०२.११.२०१५**

उपसचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मुंबई यांचेकडील शासन पत्र क्रएपीटी-२०१४/प्रक्र.१३९ आस्था- ८, दिनांक: १५ आक्टोंबर २०१५ अनुसार विहित करून देण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार जिल्हा परिषद, **कोल्हापूर**चे अधिनस्त विविध विभागांकडील, सरळसेवेने भरावयाची गट-क व गट-ड संवर्गातील रिक्त पदे व माहे ऑक्टोबर २०१५ अखेर रिक्त होणारी संभाव्य पदे विचारात घेऊन विहित नमुन्यात व फक्त ऑनलाईन पद्धतीनेच पात्र उमेदवारांकडून http://198.24.159.244/ZPK या संकेतस्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.

| ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरवात | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत |
|---|---|
| दिनांक-०२.११.२०१५ रोजी सकाळी १०.०० पासून | दिनांक-१५.११.२०१५ सायंकाळी ०५.४५ पर्यंत |

सरळसेवा भरती प्रक्रिये संदर्भातील सविस्तर जाहिरात **www.zpkolhapur.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध असून, उमेदवारांनी संपूर्ण माहिती काळजीपूर्वक समजून घेऊनच व ऑनलाईन पद्धतीनेच आपले अर्ज http://198.24.159.244/ZPK या संकेतस्थळावर भरावेत. प्रस्तुत पदांकरीता केवळ http://198.24.159.244/ZPK संकेतस्थळावरुन विहित ऑनलाईन पद्धतीने भरलेले अर्ज व विहित चलनाद्वारे भरलेले परीक्षा शुल्क ग्राह्य धरण्यात येईल. अन्य कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहिती बाबत सतत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, परीक्षेचा प्रकार, समांतर आरक्षणात अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार, तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, **कोल्हापूर** हे स्वत:कडे राखून ठेवीत आहेत. तसेच, गट `ड` चे भरतीबाबतचे सर्व अधिकार अध्यक्ष, जिल्हा निवड समिती-गट ड तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, **कोल्हापूर** यांना राहतील. त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही.

**सामाजिक / समांतर आरक्षणाच्या बिंदू नामावली नोंदवही तपासणीअंती तसेच,अन्य कारणांमुळे पदे कमी / जास्त होऊ शकतात, व समांतर आणि सामाजिक आरक्षणात बदल होऊ शकतो.**

सदर जाहिरातीत नमूद भरती संबंधी आवश्यक सर्व शासन निर्णय महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर अथवा संबंधित विभागांच्या संकेतस्थळांवर उपलब्ध आहेत.

# जि.प.कोल्हापूर सरळसेवा भरती- नोव्हेंबर २०१५
## भरावयाच्या पदांची नावे, संख्या व सामाजिक व समांतर आरक्षणानुसार विगतवारी

| पद क्र. | सामाजिक प्रवर्ग | एकूण पदे | महिला | माजी सैनिक | प्रकल्प ग्रस्त | भूकंपग्रस्त | खेळाडू | अंशकालीन कर्मचारी | अपंग | समांतर आरक्षणा शिवाय | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य-बांधकाम विभाग) - पद संख्या - १** | | | | | | | | | | |
| | इ.मा.व. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | |
| २ | **विस्तार अधिकारी (कृषि) - पद संख्या - १** | | | | | | | | | | |
| | भ.ज.ब. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | |
| ३ | **विस्तार अधिकारी (शिक्षण) वर्ग ३ श्रेणी २ - पद संख्या - १** | | | | | | | | | | |
| | भ.ज.ड. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | |
| ४ | **औषध निर्माण अधिकारी - पद संख्या - १** | | | | | | | | | | |
| | इ.मा.व. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | |
| ५ | **आरोग्य सेवक (पुरुष) ५०% हंगामी फवारणी - पद संख्या - ६** | | | | | | | | | | |
| | अनु. जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | |
| | अनु. जमाती | ४ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ३ | |
| | भ.ज. ड | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | |
| | **एकूण** | | **०** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | ० | **५** | |
| ६ | **आरोग्य सेवक (महिला) - पद संख्या - ४०** | | | | | | | | | | |
| | अनु. जाती | ९ | ० | २ | ० | ० | ० | १ | ५ पदे एका पायाने अस्थिव्यंग (OL) अपंगासाठी आरक्षीत | ६ | |
| | अनु. जमाती | ६ | ० | २ | ० | ० | ० | १ | | ३ | |
| | भ.ज.ड. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | | १ | |
| | वि.मा.प्र. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | | १ | |
| | इ.मा.व. | ७ | ० | २ | ० | ० | ० | १ | | ४ | |
| | खुला | १६ | ० | ३ | १ | ० | १ | २ | | ४ | |
| | **एकूण** | | **०** | **९** | **१** | **०** | **१** | **५** | **५** | **१९** | |
| ७ | **कंत्राटी ग्रामसेवक - पद संख्या - १४** | | | | | | | | | | |
| | अनु. जाती | ३ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | |
| | **अनु. जमाती** | ६ | २ | २ | ० | ० | ० | १ | ० | १ | |
| | वि.जा.अ. | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | |
| | इ.मा.व. | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| | खुला | २ | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| | **एकूण** | | **४** | **६** | **०** | **०** | **०** | **१** | ० | **३** | |

| पद क्र. | सामाजिक प्रवर्ग | एकूण पदे | महिला | माजी सैनिक | प्रकल्प ग्रस्त | भूकंपग्रस्त | खेळाडू | अंशकालीन कर्मचारी | अपंग | समांतर आरक्षणा शिवाय | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | **पशुधन पर्यवेक्षक - पद संख्या - २** | | | | | | | | | | |
| | अनु. जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | |
| | इ.मा.व. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | |
| ९ | **कनिष्ठ सहाय्यक (लिपिक) - पद संख्या - १** | | | | | | | | | | |
| | अनु. जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | |
| १० | **परिचर - पद संख्या - ४** | | | | | | | | | | |
| | अनु. जमाती | ४ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | |
| | **एकूण सर्व** | **७१** | **५** | **१७** | **१** | **०** | **१** | **६** | **५** | **३६** | |

## पदनिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता व लेखी परीक्षेचे वेळापत्रक.

खालील नमूद केलेली शैक्षणिक अर्हता ही दि. १५.११.२०१५ या दिनांकास प्रमाणपत्रासहीत पूर्ण धारण करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | पदाचे नांव व वेतन श्रेणी | आवश्यक शैक्षणिक अर्हता | लेखी परीक्षेचा दिनांक | लेखी परीक्षेची वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | **औषध निर्माण अधिकारी** (वेतनबॅड पीबी-१ रु.५२०० - २०२०० ग्रेड पे २८००) | औषधशाळा अधिनियम, १९४८ खालील नोंदणीकृत औषध निर्माते असतील, **किंवा** माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेले असतील आणि रुग्णालयात **किंवा** जेथे वैद्यकीय व्यवसायीच्या औषधपत्रानुसार नियमितपणे औषधे दिली जातात अशा ठिकाणी ज्यांना सात वर्षांपेक्षा कमी नसेल इतका अनुभव असेल, **किंवा** माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेले असतील अणि राज्य सरकारच्या रुग्णालयातील दवाखाना सहाय्यकांच्या पदाचा ५ वर्षांचा अनुभव. | बुधवार २५.११.२०१५ | सकाळी १०.०० ते ११.३० |
| २ | **आरोग्य सेवक (पुरुष) ५०% हंगामी फवारणी (वेतनबॅड पीबी-१ रु.५२०० - २०२०० ग्रेड पे २४००)** | विज्ञान या विषयासह माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण व राष्ट्रीय मलेरिया प्रतिरोध कार्यक्रमाअंतर्गत हंगामी क्षेत्र फवारणी कर्मचारी म्हणून नव्वद दिवसांचा अनुभव आवश्यक. | बुधवार २५.११.२०१५ | दुपारी ०२.०० ते ३.३० |
| ३ | **आरोग्य सेवक (महिला)** (वेतनबॅड पीबी-१ रु.५२०० - २०२०० ग्रेड पे २४००) | एस.एस.सी. उत्तीर्ण, शासन मान्य संस्थेतील ए.एन.एम. कोर्स उत्तीर्ण, महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल यांचेकडील रजिस्ट्रेशन किंवा अशा रजिस्ट्रेशनसाठी पात्र असतील असे उमेदवार व ज्याचे वय ४० वर्षापेक्षा अधिक नसावे. | बुधवार २५.११.२०१५ | दुपारी ०२.०० ते ३.३० |
| ४ | **विस्तार अधिकारी(कृषि)** वेतनबँड ९३००-३४८०० ग्रेड पे ४२००/- | ज्यांनी मान्यताप्राप्त विद्यापीठाची **कृषि विषयातील पदवी** किंवा इतर कोणतीही अर्हता धारण केली असेल अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाने नेमणूक करणेत येईल. | बुधवार २५.११.२०१५ | दुपारी ०२.०० ते ३.३० |
| ५ | **पशुधन पर्यवेक्षक** (वेतनबॅड पीबी-१ रु..५२०० - २०२०० ग्रेड पे २४००) | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पशुसंवर्धन संचालनालयाने चालविलेला किंवा महाराष्ट्र राज्यातील संविधानिक कृषि विद्यापीठाने चालविलेला किंवा महाराष्ट्र राज्यातील समतुल्य विद्यापीठाने चालविलेला पशुधन पर्यवेक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र राज्याच्या तंत्रशिक्षण परिक्षा मंडळामार्फत किंवा महाराष्ट्र राज्यातील संविधानिक कृषि विद्यापीठामार्फत चालविलेला किंवा महाराष्ट्र राज्यातील समतुल्य विद्यापीठाने चालविलेला दोन वर्षाचा दुग्धव्यवसाय व्यवस्थापन व पशुसंवर्धन पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपुर यांचे मार्फत चालविणेत येणारा पशुधन व्यवस्थापन व दुग्धोत्पादन पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण किंवा वैधानिक विद्यापीठामधील पशुवैद्यकिय शास्त्रातील पदवीधारण करीत असतील, असे उमेदवार | शनिवार २८.११.२०१५ | सकाळी १०.०० ते ११.३० |
| ६ | **कनिष्ठ अभियंता** (स्थापत्य) (बांधकाम) ९३००-३४८०० ग्रेड पे ४३००/- | **स्थापत्य अभियांत्रीकी या विषयातील** मान्यताप्राप्त पदवी किंवा पदविका (तीन वर्षाचा पाठयक्रम) किंवा तुल्य अर्हता धारण करून असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाने नेमणूक करण्यांत येईल. | शनिवार २८.११.२०१५ | सकाळी १०.०० ते ११.३० |

| अ. क्र. | पदाचे नांव व वेतन श्रेणी | आवश्यक शैक्षणिक अर्हता | लेखी परीक्षेचा दिनांक | लेखी परीक्षेची वेळ |
|---|---|---|---|---|
| ७ | **कनिष्ठ सहाय्यक (लिपिक)**<br>(वेतनबॅड पीबी-१ रु.५२०० -२०२०० ग्रेड पे १९००) | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण अथवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण आणि मराठी व इंग्रजी  टंकलेखन ३० श.प्र.मि. प्रमाणपत्र आवश्यक.<br>किंवा टंकलेखनामध्ये ५०% गुण मिळवून माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील परंतु उक्त दोन भाषा पैकी कोणत्याही एका भाषेतील गतीच्या प्रमाणपत्रानुसार नियुक्त केलेल्या तारखेपासून दोन वर्षाच्या कालावधीत दुसऱ्या भाषेतील दर मिनीटास ३० शब्दाहून कमी नाही, अशा टंकलेखनाच्या गतीचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक आहे. | शनिवार २८.११.२०१५ | दुपारी २.०० ते ३.३० |
| ८ | **विस्तार अधिकारी (शिक्षण),वर्ग ३,श्रेणी २**<br>(वेतनबॅड पीबी-२ रु.९३०० -३४८०० ग्रेड पे ४४००) | मान्यताप्राप्त विद्यापीठाचे स्नातक असतील आणि बीएड पदवी (किंवा तुल्य शैक्षणिक अर्हता) धारण केल्यानंतरचा प्राथमिक किंवा माध्यमिक शाळेतील अगर कनिष्ठ महाविद्यालयातील अध्यापनाचा कमीत-कमी ३ वर्षांचा अनुभव किंवा बी.एड पदवी (किंवा तुल्य शैक्षणिक अर्हता) धारण केल्यानंतरचा प्राथमिक किंवा माध्यमिक शाळा तपासण्याचा कमीत कमी ३ वर्षांचा अनुभव किंवा माध्यमिक शाळा प्रमाणपत्र पास झालेनंतरचा ५ वर्षांचा अध्यापनाचा अनुभव (बी.एड. पदवी आवश्यक) आणि शिक्षकांचे प्रशिक्षण घेतले असणे आवश्यक | शनिवार २८.११.२०१५ | दुपारी ०२.०० ते ३.३० |
| ९ | **परिचर (गट-ड)**<br>(वेतनबॅंड एस- १ रु.४४४० - ७४४० ग्रेड पे १३००) | मान्यताप्राप्त कोणत्याही प्राथमिक शाळेची कमीत कमी  इयत्ता ४ थी उत्तीर्ण उमेदवारांमधून नामनिर्देशनाने करण्यांत येईल. | रविवार २९.११.२०१५ | दुपारी ०२.०० ते ३.३० |
| १० | **कंत्राटी ग्रामसेवक**<br>मानधन दरमहा रु.६०००/- | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण व कृषि पदविका दोन वर्षाचा अभ्यासक्रम धारण किंवा कृषि पदवीधर, कृषि पदव्युत्तर पदवीधारक/बी.टेक. (ॲग्रो इंजिनिअरींग)/ यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाकडील कृषि व्यवसाय व्यवस्थापन पदविका/फळबाग उत्पादन पदविका/भाजीपाला उत्पादन पदविका/फुलशेती व प्रांगण उद्यान पदविका २ वर्षे आणि बी.एस्सी. (कृषि/उद्यानविद्या)  **किंवा**<br>उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य अर्हता परीक्षेत किमान ६० टक्के गुणांसह उत्तीर्ण किंवा शासनमान्य संस्थेची अभियांत्रिकी पदविका (तीन वर्षांचा अभ्यासक्रम) किंवा शासनमान्य संस्थेची समाजकल्याणची पदवी (BSW) आणि संगणक हाताळणी/वापराबाबत माहिती व तंत्रज्ञान (सा.प्र.वि) विभागाने शासन निर्णय दि.४ फेब्रुवारी २०१३ ने विहित केलेल्या पैकी संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण  झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. | बुधवार ०२.१२.२०१५ | सकाळी १०.०० ते ११.३० |

- **भरतीबाबतचे लेखी परीक्षेबाबतची माहिती**

**ग्राम विकास विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक एपिटी-२०१४/प्र.क्र.-१३९/आस्था-८ दिनांक ५ जुलै २०१४ नुसार**

| अ. क्र. | पदनाम | लेखी परीक्षा विषय / गुण | | | | | एकूण गुण | प्रश्नपत्रिका दर्जा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मराठी | इंग्रजी | सामान्य ज्ञान | बुध्दी मापन व गणित | तांत्रिक | | |
| १ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | ३० | ३० | ३० | ३० | ८० | २०० | सर्व विषय एस.एस.सी. दर्जा व अभियांत्रिकी पदविका दर्जाची परीक्षा |
| २ | विस्तार अधिकारी (कृषि) | ३० | ३० | ३० | ३० | ८० | २०० | मराठी १२ वी दर्जा, कृषि संबंधी प्रश्न पदवी दर्जाची परीक्षा |
| ३ | विस्तार अधिकारी (शिक्षण)वर्ग ३ श्रेणी २ | ३० | ३० | ३० | ३० | ८० | २०० | मराठी १२ वी दर्जा, शिक्षण शास्त्र संबंधी व इतर प्रश्न पदवी दर्जाची परीक्षा |
| ४ | औषध निर्माण अधिकारी | ३० | ३० | ३० | ३० | ८० | २०० | सर्व विषय एस.एस.सी. दर्जाची परीक्षा व औषध शास्त्र संबंधी प्रश्न |
| ५ | आरोग्य सेवक (पुरुष) ५०% फवारणी | ३० | ३० | ३० | ३० | ८० | २०० | सर्व १० वी दर्जाची परीक्षा व आरोग्य सेवा विषयक प्रश्न |
| ६ | आरोग्य सेवक (महिला) | ३० | ३० | ३० | ३० | ८० | २०० | एस.एस.सी. दर्जाची व आरोग्य सेवा विषयक प्रश्न |
| ७ | कंत्राटी ग्रामसेवक | ३० | ३० | ३० | ३० | ८० | २०० | सर्व विषय एच.एस.सी. दर्जाची परीक्षा व कृषि पदविका दर्जाचे प्रश्न |
| ८ | पशुधन पर्यवेक्षक | ३० | ३० | ३० | ३० | ८० | २०० | मराठी १२ वी दर्जा, विज्ञान व आरोग्य संबंधी प्रश्न पदविका दर्जाची परीक्षा |
| ९ | कनिष्ठ सहाय्यक (लिपिक) | ५० | ५० | ५० | ५० | ० | २०० | सर्व विषय एस.एस.सी. दर्जाची परीक्षा |
| १० | वर्ग -४ परिचर | ४० | ० | ४० | २० | ० | १०० | इयत्ता ४ थी दर्जा |

महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र. एपिटी-२०११/ प्र.क्र.१२९/ आस्थापना -८ दि.०५ जून, २०११ व सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रानिमं १२१४/ (प्र.क्र.४३/१४)/१३-अ दि.०५ जून, २०१४ तसेच शासन निर्णय क्र. प्रानिमं १२१५/(प्र.क्र.१०९/१५)/ १३-अ दि.०५ ऑक्टोबर, २०१५ अन्वये उपरोक्त पदांना मौखिक परीक्षा / मुलाखती लागू नाहीत.

## वयोमर्यादा :

**अ)** वयोमर्यादेकरितां उमेदवाराचे वय अर्ज करावयाच्या शेवटच्या दिनांकास म्हणजेच **दि.१५.११.२०१५** रोजीचे वय विचारांत घेतले जाईल.

**ब) दि.१५/११/२०१५** रोजी खुल्या प्रवर्गातील उमेदवाराचे वय १८ वर्षांपेक्षा कमी व ३३ वर्षांपेक्षा जास्त नसावे तसेच सामाजिक व समांतर आरक्षणानुसार खालीलप्रमाणे वयोमर्यादा विचारात घेण्यात येईल.

| अ.क्र. | आरक्षण / संमातर आरक्षण | शासन नियमानुसार आरक्षणाकरिता कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|
| १ | मागासवर्गीय उमेदवार | **३८ वर्षे** |
| २ | अपंग उमेदवार | **४५ वर्षे** |
| ३ | प्रकल्पग्रस्त | |
| ४ | भूकंपग्रस्त | |
| ५ | सन १९९१ ची जनगणना / सन १९९४ नंतरचे निवडणुक कर्मचारी | |
| ६ | अपंग माजी सैनिक | |
| ७ | स्वातंत्र्य संग्राम सैनिकाचे नामनिर्देशित पाल्य | |
| ८ | शासकीय कर्मचारी | |
| ९ | अंशकालीन कर्मचारी | **४६ वर्षे** |
| १० | उच्च गुणवत्ताधारक खेळाडू | **खुला प्रवर्ग ३८ वर्षे**<br>**मागासवर्गीय प्रवर्ग ४३ वर्षे** |
| ११ | आरोग्य सेवक (महिला) या पदासाठी | **४० वर्षे** |
| १२ | विस्तार अधिकारी शिक्षण पदासाठी | **अनुभवांसह वयोमर्यादा खुला ३५ वर्षे व मागासवर्गीयासाठी ४० वर्षे राहील.** |

माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेतील सवलत, सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक मासैक-१०१०/प्र.क्र. २७९/१०/१६अ दि २० ऑगस्ट २०१० प्रमाणे सदर उमेदवाराच्या सशत्र दलात झालेल्या सेवे इतका कालावधी अधिक ३ वर्षे राहील. तसेच अपंग माजी सैनिकासाठी शासन सेवेतील वर्ग ३, वर्ग ४ च्या पदासाठी कमाल वय मर्यादा ४५ वर्षे राहील.

**लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे राहील.**

१) शासन परिपत्रक क्र.एपिटी-२०१४/प्रक्र-१३९/आस्था-८ दि.०५.०७.२०१४ च्या सोबत जोडलेल्या परिशिष्ट `अ` नुसार प्रश्नपत्रिकेचे स्वरूप राहील.

२) परीक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील.

३) ज्या पदांसाठी लेखी परीक्षा व व्यावसायिक चाचणी (Proficiency Test) घेणे आवश्यक असेल, अशा पदांसाठी १२० गुणांची लेखी परीक्षा व ८० गुणांची व्यावसायिक चाचणी अशी एकूण २०० गुणांची परीक्षा घेणेत येईल. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.प्रानिमं-१२१५/ (प्र.क्र.५५/१५)/१३-अ दि.५ ऑक्टोंबर, २०१५ नुसार ज्या पदाकरीता व्यावसायीक चाचणी लागू आहे त्या पदाकरीता चाळणी परीक्षा घेण्यात येणार असून सदर परीक्षेतील प्रश्नांचे स्वरुप वस्तूनिष्ठ बहूपर्यायी स्वरुपाचे असेल, त्याबाबत प्रश्नांचा स्तर /दर्जा ग्राम विकास विभागाकडील शासन परिपत्रक क्र. एपिटी-२०१४/प्र.क्र.२०१४/प्र.क्र.-१३९/आस्था-८ दि.५ जुलै, २०१४ नूसार राहील.

४) जिल्हास्तरीय पदांसाठी निवड होणाऱ्या उमेदवारांना **कोल्हापूर** जिल्ह्याचा भूगोल, सामाजिक इतिहास, हवामान इ. स्थानिक बाबींची माहिती असणे आवश्यक आहे.

५) लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांना अंतिम निवडीसाठी शैक्षणिक व इतर संबंधित मूळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी वेळीच उपलब्ध करून द्यावी लागतील अन्यथा निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

६) लेखी परीक्षेसाठी पात्र/अपात्र उमेदवारांची यादी, कागदपत्रे तपासणी/छाननी, लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र व परीक्षे संबंधित सूचना या केवळ संकेत स्थळावरुनच उपलब्ध करण्यात येतील. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती/कार्यक्रमाबाबत अद्ययावत राहण्याची व **लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र स्वत:च डाऊनलोड करून घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.**

**७) उमेदवारांनी त्यांच्याकडे असलेल्या मूळ कागदपत्रांवरुन संकेतस्थळावर माहिती भरुन लेखी परीक्षेस बसण्याची संधी प्राप्त करतील. सदर उमेदवार लेखी परीक्षेच्या गुणानुक्रमानुसार पुढील प्रक्रियेसाठी पात्र ठरल्यास त्यांचे मूळ कागदपत्र पडताळणी करतेवेळी सदर कागदपत्रांमध्ये खोटी प्रमाणपत्र/असत्य अथवा चुकीची प्रमाणपत्र आढळल्यांस त्यांच्याविरुध्द भारतीय दंड संहितेतील तरतुदी नुसार फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यांत येईल.**

## विशेष सूचना-

१) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रशासन २०००/प्र.क्र. ५/२००१/३२,दि. २० जुलै २००२ व आनुषंगिक सुधारित शासन निर्णयान्वये उपरोक्त पदांकरिता अर्ज करणाऱ्या उमदेवारांनी संगणक हाताळणी /वापराबाबतचे खाली नमूद केलेले प्रमाणपत्र **(आवश्यक त्या पदांकरिता )** त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आंत प्राप्त करणे आवश्यक राहील अन्यथा त्याची सेवा समाप्त होईल.

**अ) D.O.E.A.C.C सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा**

**ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मंडळ , मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा**

**क) माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.)विभागाकडील शासन निर्णय क्र. मातंस २०१२/प्र.क्र.२७७/३९ मंत्रालय, मुंबई-३२ दि.४ फेब्रुवारी २०१३ अन्वये नमूद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल.**

२) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अनियो/१००५/१२६ सेवा-४ दि.३१ ऑक्टोबर २००५ अनुसार दि. ०१ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर ज्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होईल, त्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील. मात्र सध्या आस्तित्वात असलेल्या निवृत्ती वेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सध्या आस्तित्वात असलेल्या सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.)

**३) माजी सैनिक उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर अनुशेष एक वर्ष पुढे ओढण्यांत येऊन मा.संचालक, सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्याच सामाजिक प्रवर्गातील सर्वसाधारण उमेदवारातून पुढील नवीन भरती वर्षात पद भरण्यात येईल.**

**४) निवड झालेल्या उमेदवारांना अतिदुर्गम/दुर्गम भागात रिक्त पदी प्रथम पदस्थापना देण्यात येईल. उमेदवारांनी पदस्थापनेबाबत कोणत्याही प्रकारे सक्षम प्राधिकाऱ्यांवर दबाव आणल्यास त्यांचे नाव निवड यादीतून कमी करण्यात येईल.**

**५) लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र व परीक्षेसंबंधित सूचना या केवळ संकेत स्थळावरुनच उपलब्ध करण्यात येणार असल्याने व मोबाईल एसएमएसव्दारे/ई मेलव्दारे सूचना निर्गमित करण्यात येणार असल्याने, उमेदवारांनी सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती / कार्यक्रमाबाबत अद्ययावत राहण्याची व लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र डाऊनलोड करून घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.**

## पदांच्या निवडीसाठी कार्यपध्दती, अटी व शर्ती.

१. जाहिरातीत नमूद संवर्गनिहाय आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेल्या माहितीच्या आधारे संबंधित उमेदवारांस परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येणार असून, त्या आधारे लेखी परीक्षेत प्राप्त गुणांच्या गुणानुक्रमानुसार पात्र उमेदवारांना त्यांचे मूळ शैक्षणिक व इतर कागदपत्र पडताळणीकरीतां अंतरिम स्वरूपात यादी प्रसिद्ध करण्यात येईल. ज्या उमेदवारांची जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती, परीक्षा शुल्क व मूळ कागदपत्रांच्या तपासणीनंतर परिपूर्ण सिद्ध होईल अशा उमेदवारांचाच विचार अंतिम निवडीसाठी करण्यात येईल. म्हणून उमेदवारांनी ऑनलाईन माहिती भरतांना कागदपत्रांवरुन बिनचुक माहिती भरावी.

२. महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभागाकडील, शासन निर्णय क्र.प्रानिमं-१२१५/(प्र.क्र.५५/१५)/१३-अ. दि. ०५ ऑक्टोंबर, २०१५ अन्वये लेखी परीक्षेत समान गुण मिळाल्यास अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीमधील प्राधान्यक्रम खालील निकषांवर क्रमवार लावला जाईल.

   अ) वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

   ब) समान वय असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतर शैक्षणिक अर्हता (पदव्युत्तर पदवीधर, पदवीधर, उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे ) धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

   क) वरील अनुक्रमांक अ व ब या दोन्ही अटींमध्ये समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, सदर पदाकरीता आवश्यक असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतर गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

३. महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभागाकडील, शासन निर्णय क्र.प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दिनांक २७ जून, २००८ मधील मुद्दा क्रमांक ७ नुसार निवड समितीने तयार केलेली निवडसूची एक वर्षासाठी किंवा निवडसूची तयार करताना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आलेली आहेत त्या दिनांकापर्यंत, जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधिग्राहय ठरेल. त्यानंतर सदर निवडसूची व्यपगत होईल.

४. पदांच्या निवडीसाठी उपरोलिखित व वेळोवेळी दिलेले शासन निर्णय लागू राहतील.

## परीक्षा शुल्क :

उमेदवारांना ऑनलाईन पद्धतीने चलनाची प्रत प्राप्त करुन खालीलप्रमाणे परीक्षा शुल्क भरावयाचे आहे.

**खुला प्रवर्ग- रु. ५००/-** **मागास प्रवर्ग- ३००/-**

**माजी सैनिकांना परीक्षा शुल्क माफ आहे.**

**वर दर्शविण्यांत आलेले परीक्षा शुल्क बँक प्रक्रिया शुल्क वगळून आहे**.

स्टेट बँक ऑफ इंडियाकडुन प्रक्रिया शुल्क आकारले जाईल. सदर प्रक्रिया शुल्क उमेदवाराने भरावयाचे आहे. उक्त परीक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेच्या कोणत्याही शाखेत ऑनलाईन अर्ज भरतांना **फक्त चलनाव्दारे रोखीने भरणे आवश्यक आहे.**

## **ऑनलाईन अर्ज करण्याची पद्धत व सर्व पदांसाठी समान सूचना -**

१. जाहिरांतीत नमूद पदांकरीता फक्त http://198.24.159.244/ZPK या अधिकृत संकेत स्थळावरुन विहित ऑनलाईन पद्धतीने केलेले अर्जच स्वीकारण्यात येतील. अन्य कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा / अपूर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रियेदरम्यान त्याव्दारे पाठविल्या जाणाऱ्या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यांस त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच, ई मेल आयडी व मोबाईल संदेश वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना जिल्हा निवड समिती, **कोल्हापूर** हे जबाबदार असणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी स्वत: उमेदवाराची राहील.

२. उमेदवारांचे अर्ज http://198.24.159.244/ZPK या संकेतस्थळावर ऑनलाईन (online) पद्धतीने स्वीकारण्यात येणार असल्याने, अर्ज करतांना शैक्षणिक कागदपत्रे व अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि, ऑनलाईन पद्धतीने उमेदवाराने अर्ज सादर करतांना सदर पदासाठीचे पात्रता निकष पूर्ण असल्याबाबत खात्री करुन प्रमाणपत्रांवरुन बिनचुक माहिती अर्जात भरावी. ऑन लाईन पद्धतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यांस किंवा त्रुटी राहिल्यांस व **भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यांस** त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारांस तक्रार करता येणार नाही. एकदा ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती नंतर बदलता येणार नाही. जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी तसेच शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा शिथिलीकरण वगैरेची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.

३. उमेदवाराची लेखी परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्व तपासणी/छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे सदर कागदपत्रांच्या तपासणी अगोदरपर्यंत उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाही. कागदपत्रांच्या पूर्ण छाननी नंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. लेखी परीक्षेच्या चाळणीनुसार गुणवत्तेच्या आधारे, उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिद्ध करून उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार जिल्हा निवड समिती, **कोल्हापूर** यांचे जवळ राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवारांस कोणतीही तक्रार करता येणार नाही.

**४.** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना **www.zpkolhapur.gov.in तसेच** http://198.24.159.244/ZPK या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरतांना स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेच्या **खात्यावर शाखेत फी भरण्यासाठी चलन २ प्रतिमध्ये (उमेदवाराची प्रत, बँकेची प्रत )** उपलब्ध होईल. सदर चलनाची प्रिंट काढून त्या चलनामार्फतच उमेदवाराने चलनांत नमूद असलेली आवश्यक ती फी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत पुढच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी भरावी व सदरच्या दोन प्रतींपैकी उमेदवारांस त्याची स्वत:ची प्रत बँकेकडून परत मिळेल. बॅंकेत परीक्षा शुल्क भरण्याचा कालावधी हा **दि.०३.११.२०१५ ते दि.१७.११.२०१५ असा राहील.**

५. उमेदवाराने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत पैसे भरल्यानंतर उमेदवाराला त्याची स्थिती http://198.24.159.244/ZPK या संकेतस्थळावर पुढच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी पाहता येऊ शकेल.

६. ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराने स्वत:चा अद्ययावत (Latest) विहित नमुन्यातील पासपोर्ट साईझचा फोटो व सही स्कॅन करुन http://198.24.159.244/ZPK संकेतस्थळावरील सूचनेनुसार विहित पद्धतीने अपलोड करणे अनिवार्य आहे.

७. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर संकेतस्थळावरील ऑनलाईन अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

८. ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यांतील माहिती परिपूर्ण भरून विहित परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परीक्षेची रूपरेषा/वेळापत्रक/परीक्षा केंद्र/बैठक क्रमांक इ. बाबतची माहिती वर दिलेल्या संकेतस्थळावर वेळोवेळी उपलब्ध करून देण्यात येईल. या संबंधित स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती बाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

९. अपंग संवर्गातील उमेदवाराकडे अपंगत्वाबाबत आवश्यक ते प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक न्यायाप्र-२०१४/प्र.क्र.१/अ.क.-२ दि. १८ मार्च २०१४ अन्वये अपंग उमेदवारांस लेखनिकाची मदत आवश्यक असल्यास, ऑनलाईन अर्ज भरतांना तसा स्पष्ट उल्लेख करावा. उमेदवारांनी लेखनिकाची अर्जात मागणी केलेली नसेल अशा अपंग उमेदवारांना ऐन वेळेस लेखनिक पुरविला जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी. अपंग प्रवर्गातील पात्र उमेदवाराची अंतिम नियुक्ती ही स्थायी वैद्यकीय मंडळाच्या प्रमाणपत्र पडताळणीच्या आधारेच करण्यात येईल.

१०. ज्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नांव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे, सेवा योजन कार्यालय, समाज कल्याण, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयांत नांवे नोंदविली आहेत, अशा उमेदवारांना विहित मुदतीत स्वतंत्ररीत्या ऑनलाईन अर्ज करणे व परीक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील. तसेच, प्रकल्पग्रस्त, अंशकालीन कर्मचारी अशा उमेदवारांनी देखील भरतीच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व अशा उमेदवारांना कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

११. अत्युच्च गुणवत्ता धारक खेळाडूसाठी असलेले आरक्षण शालेय व शिक्षण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र./६८/क्रियुसे-२ दि.३० एप्रिल २००५ मधील तरतुदीनुसार खेळाडूसाठी राखीव असलेल्या पदावर निवडीसाठी अर्हता पुढीलप्रमाणे असेल. सदर पदासाठी त्या त्या खेळाच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धांमध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम, द्वितीय, तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त करणारा खेळाडू राज्य अजिंक्यपद स्पर्धा या सदराखालील खेळांच्या महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात. तसेच, भारतीय खेळ प्राधिकरणाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय, शालेय स्पर्धांमध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय स्थान प्राप्त करणारा खेळाडू. असे उपरोक्त नमूद केलेप्रमाणे खेळाडूच्या आरक्षित जागेसाठी पात्र ठरतील. खेळाडूच्या आरक्षित पदावर नेमणुकीकरिता ज्या खेळाडूची शिफारस होईल त्यांची प्रमाणपत्रे संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या कार्यालयाकडे तपासणीसाठी पाठविणेत येऊन प्रमाणपत्र वैध ठरल्यानंतरच सदर उमेदवारांना नेमणूक देण्यात येईल.

१२. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक न्यायप्र-१००९/प्र.क्र.२०२/४९/१६-अ दि. २७ ऑक्टोंबर २००९ अन्वये पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन या समांतर आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी ``**सुशिक्षित बेरोजगार**`` या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्ष काम केल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र व रोजगार मार्गदर्शक केंद्रामध्ये सदर अनुभवाची नोंद केल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे व तशी नोंद ऑनलाईन अर्जात नमूद करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र व सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१३. सेवायोजन कार्यालय, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी, जिल्हाधिकारी यांचेकडून प्राप्त होणाऱ्या जनगणना कर्मचारी, अंशकालीन कर्मचारी, प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, जिल्हा सैनिक कल्याण बोर्डाकडून शिफारस होणाऱ्या उमेदवारांनी त्यांचे शैक्षणिक पात्रतेनुसार प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीनुसार विहित नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

१४. प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त या समांतर आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांनी संबंधित जिल्ह्यातील मा.जिल्हाधिकारी/जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांच्याकडील प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त प्रमाणपत्राची मूळ प्रत कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवयक आहे.

१५. अनुभवाच्या बाबतीत मासिक, नियतकालिक, अंशकालिक, विद्यावेतन, अंशदानात्मक, विनावेतन तत्वावर केलेला अंशकालिक सेवेचा कालावधी, तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राह्य धरता येणार नाही.

१६. **सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र .बीसीसी २०११/प्र.क्र .१०६४/२०११/१६-ब दिनांक १२ डिसेंबर २०११ अनुसार मागासवर्गीय उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील. सदर शासन निर्णयान्वये निवड यादीत निवड झालेल्या उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास, ०६ महिन्यांचे आंत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील व या विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास संबंधित उमेदवारांना सेवेतून कमी करण्यात येईल.**

१७. माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत सैन्यात काम केल्याबाबतचे आवश्यक कागदपत्र व जिल्हा सैनिक बोर्डात नांवनोंदणी केले असल्याबाबतचे प्रमाणपत्र व सेवा तपशील दर्शविणारे अभिलेख प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. तसेच, निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्राची सक्षम अधिकाऱ्याकडून पडताळणी झाल्याशिवाय त्यांना नियुक्ती देण्यात येणार नाही.

१८. माजी सैनिक या समांतर आरक्षणामध्ये युद्ध काळात व युद्ध नसतांना सैनिक सेवेत मृत्यू झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य ठरलेल्या माजी सैनिकांच्या कुटूंबातील फक्त जवानाची पत्नी किंवा अपंग जवानाची पत्नी यांना नियुक्ती देणेचे धोरण आहे व त्यानंतर त्याची अविवाहित मुलगी/ अविवाहित मुलगा यांचा समावेश आहे व त्यांचा १५ % समांतर आरक्षणातून विचार करणेत येईल.

१९. उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. (डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक) अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे किंवा त्याचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा दाखला सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात डोंमिसाईल प्रमाणपत्राची अट लागू रहाणार नाही. तसेच, सदर परीक्षार्थीकडे जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या परीक्षार्थीने शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु, सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद आवश्यक आहे. उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या परीक्षार्थींना लागू राहतील.

२०. भूकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी शासन नोकरी मिळणे बाबत सक्षम अधिकारी यांचे विहित प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

२१. शासन परिपत्रक क्र .सीबीसी-१०/२००६/प्र.क्र.१५/मावक-५ दिनांक ५ जून २००६ अनुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्ग वगळता उर्वरित मागास प्रवर्गातील (वि.जा.अ/भ.ज.ब/भ.ज.क/ भ.ज.ड/ विमाप्र/ इमाव) उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत वर्ष २०१५-१६ या कालावधी करिता वैध असलेले (दि. ३१.०३.२०१५ अखेरचे) अद्ययावत नॉन क्रीमिलेयर प्रमाणपत्र सदर अर्ज ऑनलाईन पद्धतीने सादर करतांनाच प्राप्त करणे आवश्यक आहे.

**२२.** ज्या महिला उमेदवारांना महिला आरक्षणाचा लाभ हवा असेल, त्यांनी तशी मागणी ऑनलाईन अर्जात स्पष्टपणे करणे अनिवार्य आहे. महिला व बाल कल्याण विभागाकडील शासन निर्णय क्र. ८२/२००१/म.से.आ-२०००/प्र.क्र.४१५/का.२, दि.२५.०५.२००१ मधील तरतुदीनुसार महिलांसाठी आरक्षण राहील. सदर आरक्षणाचा लाभ प्राप्त करणाऱ्या महिला उमेदवारांनी (मागासवर्गीय प्रवर्गाच्या महिला उमेदवार वगळून) वर्ष २०१५-१६ या कालावधी करिता वैध असलेले ( दि ३१.०३.२०१५ पर्यंत असलेले) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे ३० टक्के महिला आरक्षणाबातचे प्रमाणपत्र व विवाहीत महिला उमेदवारांनी विवाहानंतर धारण केलेल्या कुटूंबाचे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्या बाबतचे प्रमाणपत्र सदर अर्ज ऑनलाईन पद्धतीने सादर करतांनाच प्राप्त करणे आवश्यक आहे. खुला महिला समांतर आरक्षणातून निवड झालेल्या उमेदवारांना, ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र मा.आयुक्त, महिला व बाल कल्याण, पुणे यांच्याकडून पडताळणी होऊन वैध

ठरल्यानंतरच नियुक्ती देणेत येईल. तसेच, मागास प्रवर्गातील ज्या महिला उमेदवारांची खुल्या प्रवर्गातील आरक्षित पदावर निवड होईल, त्यांनी सक्षम प्राधिकारी यांचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नंतरच त्यांना नियुक्ती देणेत येईल.

२३. शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या संबंधित नियुक्ती प्राधिकरणाच्या परवानगीने भरावयाचे आहेत. अशा परवानगी पत्राची प्रत कागदपत्र पडताळणीचे वेळी उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे.

२४. सदर जाहिरातीत नमूद कांही संवर्गाची रिक्त पदे ही माहे आक्टोंबर २०१५ अखेर रिक्त होणारी पदे लक्षात घेऊन दर्शविलेली असल्याने, त्यानुसार अंतिम निवड यादीतील जेष्ठतेनुसार नियुक्ती आदेश देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

२५. सामान्य प्रशासन विभागाकडील अधिसूचना क्र. एसआरव्ही २०००/प्रक्र-१७/२०००/१२ दि. २८ मार्च २००५ व शासन परिपत्रक एसआरव्ही-२०००/प्र.क्र १७/२००० दि. ०१ जुलै २००५ अन्वये विहित केले अनुसार लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र नमुना अ आवश्यक अर्हता म्हणून भरणे आवश्यक आहे. उमेदवार अविवाहित असल्यास, ऑनलाईन अर्जात याबाबत स्पष्ट उल्लेख करावा. व कागदपत्र पडताळणीचे वेळी उमेदवाराकडे सदरची प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुबांचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापनाच्या नमुना - अ**

प्रतिज्ञापन (नियम ४ पहा)

मी श्री. श्रीमती /कुमारी ---------------------------------------------------------------- श्री. ---------------------------------------------------------- यांचा /यांची / मुलगा / मुलगी / पत्नी वय-----------वर्ष राहणार- -------------------------------------------------------------------- याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहीर करते /करतो की,

१) मी ------------------------------------ या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२) आज रोजी मला ------------ (संख्या) इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या--------------------आहे (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा) १. दि. / / २. दि. / /

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल, तर दिनाक २८ मार्च २००५ तदनंतर जन्माला आलेल्या, मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :- / /२०१५

**अर्जदाराची सही**

अर्जदाराचे संपूर्ण नांव :- ------------------------------------------

२६. ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परीक्षेस बसण्याचा/कागदपत्र पडताळणीस बोलविणेचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे असत नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविल्याचे आढळल्यास अथवा एखाद्या अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरीत्या दबाव आणल्यास अथवा गैर प्रकाराचा अवलंब केल्यास त्यांस निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. तसेच, नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता, त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्यांच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

२७. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनांस आल्यांस त्या उमेदवारांची उमेदवारी/नियुक्ती रद्द करण्यात येईल व शासनाची दिशाभूल केल्या प्रकरणी सदर उमेदवारां विरूद्ध योग्य ती कारवाईही करण्यात येईल.

२८. महिला, खेळाडू, अपंग, माजी सैनिक, अंशकालीन कर्मचारी, प्रकल्पग्रस्त, इ. या समांतर आरक्षणाच्या पदांच्या बाबतीत आवश्यक ती सर्व संबंधित कागदपत्रे/प्रमाणपत्रे तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच, शासन निर्णयांमधील तरतुदीनुसार माजी सैनिक उमेदवाराने माजी सैनिक समांतर आरक्षणाचा पूर्वी लाभ घेऊन शासकीय नोकरी स्वीकारली असेल तर पुन्हा समांतर आरक्षणाचे लाभांस तो उमेदवार पात्र राहणार नाही. तसेच, अंशकालीन उमेदवाराने एकदा समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास, त्याच उमेदवारास पुन्हा समांतर आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही. तसे आढळल्यास कोणत्याही वेळी निवड रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२९. समांतर आरक्षणाबाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ दि.१३ ऑगस्ट २०१४ नुसार निवड याद्या तयार करणेत येऊन उमेदवारांची निवड करण्यात येईल.

३०. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्रमांक चापअ १०१२/प्र.क्र.६३/१६-अ दिनांक २६ ऑगस्ट २०१४ नुसार अंतिम निवड झालेल्या उमेदवारास कार्यालयाकडे साक्षांकन नमूना भरुन दयावा लागेल. त्या आधारे त्या त्या पोलिस अधीक्षक कार्यालयाकडून चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती देणेत येईल. चारित्र्य-पूर्वचारित्र्य पडताळणीअंती आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास, संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी/सेवेसाठी पात्र राहणार नाही. तसेच, कोणत्याही टप्प्यावर असे उमेदवार अपात्र ठरतील.

३१. निवड झालेल्या उमेदवारांना आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्र/हमीपत्र इ. ची पूर्तता करणे आवश्यक राहील तसेच, त्या प्रमाणपत्रांची पडताळणी विहित पद्धती अनुसार करून घेणेही बंधनकारक राहील. सेवेत नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना नियमानुसार आवश्यक ती परीक्षा/प्रशिक्षण विहित मुदतीत उत्तीर्ण/पूर्ण करणे आवश्यक राहील.

३२. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३/१६-ब दिनांक २१ फेब्रूवारी २०१५ नुसार बिंदू नामावली नोंदवही सहाय्यक आयुक्त, मागासवर्ग कक्षाकडून तपासणीचे काम सुरु आहे, ते अंतीम झालेले नाही. तपासणी झाल्यानंतर जाहिरातीमध्ये नमूद पदसंख्येत परीक्षेपूर्वी अथवा निवड यादी प्रसिध्द करणे पूर्वी सामाजिक व समांतर आरक्षणामध्ये बदल होणेची शक्यता आहे. त्यानुसार रिक्त पदे भरणेची कार्यवाही केली जाईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३३. माजी सैनिक व अपंग उमेदवार वगळता समांतर आरक्षणाच्या पदांसाठी समांतर आरक्षणाप्रमाणे उमेदवार उपलब्ध न झाल्यास, त्याच प्रवर्गातील सर्वसाधारण उमेदवारांतून गुणानुक्रमे निवड करण्यात येईल.

३४. अपरिहार्य कारणास्तव अथवा नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा शासन आदेशाने विहित दिनांकास लेखी परीक्षा घेणे शक्य नसेल तर शासन ठरवून देईल त्याप्रमाणे सोईच्या दिवशी लेखी परीक्षा घेणेत येईल. याबाबत वृत्तपत्राद्वारे/संकेतस्थळावर/ईमेल/मोबाईल एसएमएस व्दारे कळविणेत येईल.

३५. लेखी परीक्षेसाठी व कागदपत्रे पडताळणीसाठी उमेदवारांस स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

३६. वरील अटी, शर्ती, नियमांव्यतिरिक्त शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश व निर्णय लागू राहतील.

३७. सदर भरती प्रक्रियेसंदर्भात जिल्हा निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

३८. जाहीरातीमधील काही मुद्दे भरती नियमावली व शासन निर्णयाशी विसंगत असल्यास प्रत्यक्षात निवड प्रक्रिया ही महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ (मराठी/इंग्रजी प्रत) मधील तरतूद व निवड प्रक्रिया अंतिम होईतोपर्यंत प्राप्त शासन अधिसूचना/शासन निर्णय/शासन परिपत्रक व शासन सूचना त्या त्या पदास लागू असल्यास त्याप्रमाणे निवड प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल, याबाबत कोणासही आक्षेप घेता येणार नाही.

४०. शासनाच्या धोरणानुसार काही संवर्गाची अथवा सर्व भरती प्रक्रिया रद्द करणेचे आदेश प्राप्त झालेस तसेच भरती प्रक्रिया वेळापत्रकामध्ये काही बदल झालेस, अर्ज सादर केलेल्या उमेदवारांचे परीक्षा शुल्क ना-परतावा असेल.

४१. ज्या दिवशी लेखी परीक्षा होईल त्या दिवशी किंवा त्याचे दुसरे दिवशी प्रश्नपत्रिकेची उत्तरतालिका (Answer Key) वेबाईटवर प्रसिध्द करुन उमेदवारा कडून ३ दिवसात हरकती मागवून लेखी परीक्षेचा अंतिम निकाल ८ दिवसात प्रसिध्द करण्यात येईल व त्यानंतर नियुक्तीची कार्यवाही करणेत येईल.

४२. आरोग्य सेवक (महिला) या पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी अर्ज केलेल्या दिनांकास महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल यांचे रजिस्ट्रेशन किंवा रजिस्ट्रेशन नुतनीकरणासाठी सादर केलेल्या कागदपत्राची पोहोच पत्र (स्लिप अथवा रिसिट) उपलब्ध असणे अनिवार्य राहील.

४३. विस्तार अधिकारी (शिक्षण)श्रेणी-२ वर्ग ३ या पदासाठी प्राथमिक शाळेतील अध्यापनाचे अनुभवाचे प्रमाणपत्र हे गट शिक्षण अधिकारी/प्रशासन अधिकारी नगरपालिका यांचे स्वाक्षरीचे असणे आवश्यक असून माध्यमिक शाळेतील अध्यापनाचा अनुभवा करीता शासन मान्य माध्यमिक शाळा असणे आवश्यक आहे. आणि त्या साठी वैयक्तिक मान्यता/संचमान्यता शिक्षण अधिकारी (माध्यमिक) यांच्या मंजुरीच्या वर्ष निहाय प्रती उपलब्ध असणे आवश्यक आहे. मात्र खाजगी क्लास किंवा शासन मान्यता नसलेल्या शाळेचा अनुभव ग्राह्य धरता येणार नाही.

रिक्त पदे भरतीचा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | भरती प्रक्रिया कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| १. | अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याचा कालावधी | दि. ०२.११.२०१५ (सकाळी १०.०० वाजेपासून) ते दि. १५.११.२०१५ (संध्याकाळी ०५.४५ वाजेपर्यन्त) |
| २. | बॅंकेत विहित परीक्षा शुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक | दि.१७/११/२०१५ |

## विशेष सूचना-

- या परीक्षेत ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरतांना जरी उमेदवारांना कोणतीही कागदपत्रे सादर करावयाची आवश्यकता नसली, तरी, ज्या उमेदवारांकडे पदाकरितां आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी विनाकारण अर्ज करु नयेत.
- अर्जदारांना अर्ज भरण्या संदर्भात कांही अडचणी आल्यांस त्यासाठी त्यांनी भ्रमणध्वनीवर क्रमांक

**९७६९१९९४२१ व ९७६९४४९६४४** वर संपर्क साधावा.

**सदस्य**
**जिल्हा निवड समिती तथा**
**कार्यकारी अधिकारी,(बांधकाम)**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**

**सदस्य**
**जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**

**सदस्य**
**जिल्हा निवड समिती तथा**
**शिक्षणाधिकारी (प्राथ.)**
जिल्हा परिषद, कोल्हापूर

**सदस्य**
**जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हा आरोग्य अधिकारी ,**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**

**सदस्य**
**जिल्हा निवड समिती तथा**
**कृषि विकास अधिकारी ,**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**

**सदस्य**
**जिल्हा निवड समिती तथा**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी(ग्रा.पं.)**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**

**सदस्य**
**जिल्हा निवड समिती तथा**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी(सा.)**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**

**सदस्य**
**जिल्हा निवड समिती व अध्यक्ष**
**गट ड जिल्हा निवड समिती तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**

**अध्यक्ष**
**जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हाधिकारी, कोल्हापूर**